जूनी ख्यात JUNI KHYAT जूनी ख्यात JUNI KHYAT

JUNI KHYAT
जूनी ख्यात

# CERTIFICATE OF PUBLICATION

This Publication certificate has been issued to

**प्रा. डॉ. शीला गोंडबोले पाईकराव**

ग्रंथपाल दांडेकर महाविद्यालय, पालघर

For the Research paper title

**महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुलभुत तत्त्वज्ञानातील साम्य : एक अभ्यास**

Vol.11 Issue 05 No.02 Month May Year.2021

Published in

JUNI KHYAT JOURNAL ISSN: 2278-4632

Impact Factor : 6.625

This journal is indexed, peer reviewed and listed in UGC CARE

PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist. Palghar. Pin 401 404

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
University Grants Commission
Approved Journal

JUNI KHYAT

Editor

6.625
Impact factor

जूनी ख्यात JUNI KHYAT जूनी ख्यात JUNI KHYAT

Juni Khyat
(UGC Care Group I Listed Journal)
ISSN: 2278-4632
Vol-11 Issue-05 No.02 May 2021

# महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुलभुत तत्त्वज्ञानातील साम्य : एक अभ्यास

**प्रा. डॉ. शीला गोंडबोले पाईकराव** ग्रंथपाल दांडेकर महाविद्यालय, पालघर

**प्रस्तावना :**

मानवतेच्या उत्क्रांत अवस्थांमध्ये वैचारिक व व्यवहारिक स्तरांवर आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी समाज तसेच व्यक्तीगत जडणघडण करण्यासाठी उदात्त मुलभूत आदर्शांची पेरणी वेळोवेळी करावी लागते. व ही सामाजिक मानवी मुल्यें समाजात रूजविण्यासाठी महापुरूष आपआपल्या कालखंडात प्रयत्नरत होते. जगा व जगू द्या या मानवी निसर्गदत्त मुलभूत तत्त्वांचा प्रसार अनेक संत, महापुरूषांनी सातत्याने केला आहे. समानता, बंधुता, न्याय ही नैसर्गिक मानवी मुल्ये आहेत. मात्र तरीही जात, धर्म, रंग, लिंग, वर्ण, प्रदेश, गरीब, श्रीमंत अशा विविध कारणांमुळे जगाच्या कित्येक भागात मानवामध्ये सामाजिक विभाजन घडवून आणण्यात आले आहे.

मानवनिर्मित ग्रंथ, धर्मग्रंथांचा, रूढी परंपरांचा आधार घेऊन काही जाती, धर्म व सामाजिक समुहाविरूद्ध षडयंत्र करून काही लोकांना त्यांचें मुलभूत हक्क नाकारण्यात आले आहेत. वास्तविक नैसर्गिकरित्या कोणत्याच प्रकारचे भेद समाजसंमत असायला नकोत मात्र तरीही कधी देवांचा, धर्माचा तर कधी धर्मग्रंथाचा दाखला देत भेदमुलक विचारांचे उदात्तिकरण करण्याचा प्रयत्न प्राचीन काळापासूनच काही हितसंबंध जोपासणाऱ्या व्यक्ती व समुह करत आले आहेत. भेदमुलक सामाजिक रचना अबाधित ठेवणाऱ्या व्यक्ती व समुहाचे प्रयत्न संघटित असल्यामुळे व अत्याचारीत घटक असंघटित असल्यामुळे तसेच काही ठिकाणी सामाजिक भेद जोपासणाऱ्या घटकांना राजकीय, धार्मिक व्यवस्थेचे संरक्षण असल्यामुळे पूर्ण समता मुलक समाज बनविण्यात अडचणी येतात. ही प्रक्रिया शेकडो वर्षापासून सुरू आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकिय समानता निर्माण करण्यासाठी तसेच सर्वच प्रकारच्या भुदमुलक व्यवस्थात्मक समाजाचे विखंडीकरण करण्यासाठी महापुरूष व संत प्रत्येक काळात विषतेचा पुरस्कार करणाया व्यक्ती व समुहाविद्ध लढले आहेतच. यासाठी वैयक्तिक आचरण ते सामाजिक प्रबोधन हे तंत्र काहींनी वापरले आहे. त्यांचे प्रयत्न प्रत्येक कालखंडात बयापैकी यशस्वी झालेले दिसतात. पण अजुनही त्यांचे स्वप्न व जीवनकार्य पूर्ण झालेले दिसत नाही. मानवता वादाच्या विरोधात ज्या म्हणून प्रवृत्ती आहेत त्यांचे सामाजिक प्रबोधनाच्या माध्यमांतून निर्दालन करण्याचे महापुरूषांचे कार्य अव्याहतपणे सुरू आहे. या महापुरूषांचे सर्वच प्रकारच्या समताधिष्टित समाज निर्माणाचे कार्य पिढ्यां दर पिढ्या सुरूच आहे. ज्या महापुरूषांनी आपल्या जीवन, विचार व कार्याद्वारे आदर्श व मुलभूत समानता मुलक समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावरील महापुरूष आहेत. आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी जी सामाजिक मुल्ये समाजाच्या पोषण व वृद्धीसाठी आवश्यक असतात. ती सामाजिक मुल्ये या दोन्ही महापुरूषांनी समाजात पेरण्याचा प्रयत्न केला आहे. प्रवाहाच्या त्या त्या वेळेच्या समाजव्यवस्थेला नाकारून संघटित असामाजिक व्यक्ती व समुहाविरूद्ध त्यांनी खूप मोठा वैचारिक संघर्ष केला. भारतीय समाजव्यवस्थेतील विषमतेला खतपाणी घालणाऱ्या व संरक्षण देणाऱ्या घटकांविद्ध या दवयींनी खूप मोठा लढाच उभारला होता. विषतेविरूद्ध त्यांनी एक प्रकारे सामाजिक बंड केले होते. प्रचलित वैचारिक प्रवाहाच्या व सामाजिक व्यवस्थेच्या विरूद्ध लढून प्रत्येकाला प्रत्येकाचे मानवी अधिकार मिळालेच पाहीजेत, यासाठी या दोन्ही महापुरूषांचे वैचारिक लढे तलवारीच्या जोरावर उभ्या केलेल्या क्रांतिपेक्षा कितीतरी पटींनी अधिक परिणामकारक ठरले आहेत. या दोन्ही महापुरूषांनी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट समाज व्यवस्था व समांनता, बंधुता, न्याय आधारित समाज निर्माणासाठी खूप मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या विचारांचा गाभाच मुळात मानवता असल्यामुळे प्रत्येकाला त्यांचे अधिकार मिळालेच पाहीजे. कोणत्याच व्यक्तीवर कोणीही कोणत्याच बाबींचा आधार घेऊन कोणत्याच प्रकारची सामाजिक, धार्मिक, राजकिय, जातीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक बंधने घालू शकत नाही.



Copyright @ 2021 Author

PRINCIPAL
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
Palghar (W.R.)
Dist Palghar. Pin 401 404

Juni Khyat
(UGC Care Group I Listed Journal)
ISSN: 2278-4632
Vol-11 Issue-05 No.02 May 2021

प्रत्येकाला प्रत्येक प्रकारची संधी व संधीची समानता मिळविण्याचा व त्याप्रमाणे जीवनयापन करण्याचा नैसर्गिक अधिकार आहे व त्यामुळे कोणीही कोणावर अशा प्रकारचे अधिकार नाकारून दास्य लादू शकत नाही किंवा कोणास बंधनात टाकू शकत नाही. हया दोन्ही महापुरूषांनी आपल्या वैयक्तिक जीवनात जी तत्त्वे आचरणात आणली व वैयक्तिक आचरणाच्या जोरावरच ती समाजातही पेरली. त्यामुळे एक रक्तविहिन क्रांती करण्याचा त्यांचा प्रयत्न खऱ्या अर्थाने यशस्वी झाला आहे. ह्या दोन्ही महापुरूषांचे जीवन व कार्य कालखंड वेगळा असला तरी त्यांच्या आचरण, विचार, मुलभूत तत्त्वे व आदर्श समाज व्यवस्थेंच्या संकल्पनेमध्ये खूप मोठे साम्य आहे. त्यांच्या विचारातील साम्यस्थळशोधण्याचा प्रयत्न या Article मध्ये केला आहे.

**डॉ. बी. आर. आंबेडकर :**

भारतीय व आंतरराष्ट्रीय (जागतिक) समाजजीवनांवर ज्या व्यक्तींचा प्रभाव आढळून येतो त्यामध्ये डॉ. आंबेडकर यांचे नाव अग्रणी आहे. त्यांचे जीवन विचार व कार्याने जागतिक मानवी समाज प्रभावित झाला आहे. जिथे जिथे विषमतेविद्ध, शोषण व अत्याचाराविरूद्ध लढे उभारले गेले किंवा आजही संघर्ष सुरू आहे. अशा लोकांसाठी डॉ. आंबेडकर एक चिरंतन प्रेरणा ठरले आहेत. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक भेद हे मानवतेविरूद्ध आहेत. रूढी परंपरा व शास्त्रे ही निसर्गाच्या व मानवतेच्या विरूद्ध असून ती मानवतेच्या विरूद्ध आहेत. त्यामुळे सामाजिक समता, आर्थिक समता, मानवा मानवामध्ये बंधुता व समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय मिळालाच पाहीजे ही त्यांची विचारप्रणाली राहीली व त्याच्या पुर्णत्वासाठी ते आयुष्यभर लढले. अस्पृश्य समाजात जन्मल्यामुळे भेदभावाची तीव्रता व त्यांचे स्वरूप काय असते. हे त्यांनी स्वत: अनुभवले व तितक्याच तीव्रतेने त्या विरूद्धचा संघर्ष त्यांनी उभा केला. भारतीय समाजातील वर्ण व जातीय व्यवस्थेमुळे भारतीय समाज भारतीय समाज व्यवस्थेला रेतीप्रमाणे प्रसरणता प्राप्त झाली होती. वर्णातून पुढे जाती निर्माण झाल्या व पुढे जातव्यवस्था इतकी मजबुत झाली की त्यामुळे व्यक्ती व समाजातून बंधुता नष्ट झाली. रूढी, परंपरा व शास्त्रे यांच्या आधारे अस्पृश्य व शुद्रांचे सारे मानवी अधिकार नाकारून एक प्रकारे त्यांना धार्मिक बंधनाच्याद्वारे देव वशास्त्राचा धाक दाखवून गुलामगिरीच्या दास्य चक्रात अडकवून टाकण्यात आले. भारतीय उपखंडात एक मोठ्या वर्गाच्या वाट्याला हे विषमतेचे जगणे आले होते. व हे जगणे दलित व अस्पृश्य वर्गासाठी दैविय आहे असा ही विचार धर्म व शास्त्राचा अधार घेऊन पसरविण्यात आला. भारतीय समाजाचा एक मोठा वर्ग बहिष्कृत करण्यात आला होता. गुलामगिरीच्या हजारो वर्षापासून चालत आलेल्या दृष्टचक्रात हा समाज इतका अडकून पडला की त्या समाजाने तेही जगणे दैविय मानले व अत्याचार सहन केले. संत महात्म्यांनी अशा प्रकारची अशा प्रकारची एका विशिष्ट वर्गावर लादलेली बंधने व नियम झुगारण्याचा प्रयत्न केला पण ते प्रयत्न असंघटित, नैतृत्वहीन व सहिष्णुतेच्या भावनेतून असल्यामुळे ते म्हणावे तेवढे यशस्वी होऊ शकले नाही स्वामी दयानंद सरस्वती ते स्वामी विवेकानंद, संत कबीर ते संत रविदास, गुरू नानक ते महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम अशा विविध महात्म्यांनी आपापल्या कालखंडात आदर्श समाजाची भरण पोषण करण्याचा प्रयत्न केला पण त्यामुळे भारतीय समाजातील विषमता व दैन्य नष्ट होऊ शकले नाही. सहिष्णूता हेच त्यांच्या अधिष्ठानाचा पाया असल्यामुळे भारतीय समाज व्यवस्थेत उलथापालथ होऊ शकली नाही. अगदी महात्मा गांधीचेही अस्पृश्यता निवारणाचे प्रयत्न तोकडे पडले. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यद्धोरांसाठी सर्वच बाजूंनी चौफेर संघर्ष उभा केला. अस्पृश्य समाजात जाऊन त्यांना त्यांच्या मानवी अधिकारांची जाणिव करून दिली. त्यांच्यांत त्यांच्या अधिकारांप्रती क्रांतिची मशाल पेटविली. अस्पृश्यांना त्यांचे मानवी अधिकार मिळालेच पाहीजते यासाठी त्यांनी वैयक्तिक स्तरावर संघर्ष केला. अस्पृश्यांना सोबत घेऊन त्यांच्या समवेत ते अग्रस्थानी राहीले त्यामुळे या कार्यात अस्पृश्य समाज खऱ्या अर्थाने त्यांच्या समवेत संघर्ष करू लागला. डॉ. आंबेडकर यांचे अधिकार मागणे हे सहिष्णूता तत्त्वाचे नव्हते तर ते मानवी अधिकार हे मागून मिळत नसतात ते संघर्ष करूनच मिळवावे लागतात या स्वरूपाचे होते. भिक नको, दया नको मानवी अधिकार हा अस्पृश्यांचा अधिकार आहे व तो मिळविण्यासाठी त्यांनी चौफेर संघर्ष उभा केला. त्यांचे ज्ञान व वैयक्तिक


Copyright @ 2021 Author

Juni Khyat
(UGC Care Group I Listed Journal)
ISSN: 2278-4632
Vol-11 Issue-05 No.02 May 2021

आचरण शुद्ध व प्रामाणिक असल्यामुळे अस्पृश्य वर्णाचे नितांत प्रेम व सहकार्य त्यांना मिळाले व त्यांनी उभारलेला प्रत्येक लढा ते खंबीरपणे लढू लागले. ज्ञानपिपासु असणाऱ्या या महापुरूषांने सर्वच धर्माचा तुलनात्मक अभ्यास केला होता. जगात विविध देशात झालेल्या समाज व राजकिय कामांचा अभ्यास केला होता. भारतीय भारतीय इतिहास व सामाजिक रचनेचा व भारतीय शास्त्रांचा त्यांनी प्रचंड अभ्यास केला होता. भारताला सध्या कशाची गरज आहे हे त्यांनी खऱ्या अर्थानी ओळखले होते. इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, कायदा, तत्त्वज्ञान अशा मुलभूत ज्ञानशाखांचा त्यांचा प्रचंड व्यासंग असल्यामुळे त्यांच्या जीवन व कार्याला ज्ञानाचे अधिष्ठान होते. राज्यघटनेच्या माध्यमातून त्यांनी त्यांच्या जीवनातील अपेक्षित नितीतत्त्वे तसेच समाजाच्या उन्नयनासाठी आवश्यक तत्त्वे संविधानात उतरविली आहेत. समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता, सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य भेदविरहीत समाज व्यवस्था याद्वारे प्रगत समाजव्यवस्था निर्माण करण्याचे त्यांचे कार्य संविधानाच्या माध्यमातून यशस्वी झाले आहे. आजघडीला कश्मिर ते कन्याकुमारी आखील भारतीय दलित वर्ग SC, ST, OBC वर्गसमुहामध्ये त्यांच्या जीवन व कार्यामुळे अधिकारांची जाणिव निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे त्यांनी या वर्गाचे अधिकार घटनात्मक करून सुरक्षित केले आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले :

ज्या आतंरराष्ट्रीय समाजपुरूषांमध्ये टॉलस्टॉय, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांचा समावेश होतो त्यामध्ये भारतीय उपखंडातून महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव घेणे अपरिहार्य आहे.

महात्मा फुले हे भारतातील सर्वाधिक प्रभावशाली व समाजसुधारकांचे सुधारक समजले जातात. भारतीय समाजातील रूढी, परंपरा, अस्पृश्यांचे दुःख, दैन्य, गुलामगिरी तसेच स्त्रियांचे नाकारलेले अधिकार, शेतकरी, मजूर, स्त्रिया व दलित वर्गाचे होणारे अन्यायकारक शोषण या विरूद्ध महात्मा फुल्यांनी खूप मोठी क्रांति केलीय. ब्रिटीशांची सत्ता असूनही खूप मोठा वर्ग पिडीत होता, अत्याचारी होता. स्त्रिया व अस्पृश्यांचे शिक्षणाचे, अर्थकारणाचे अधिकार नाकारण्यात आले होते. अर्थशास्त्राचा आधार घेऊन सनातनी लोक स्त्रियांना दास्यांत ठेवू पाहत होते. शिक्षणापासून वंचित ठेवत होते पण फुले यांनी या सामाजिक मान्यतांच्या विरूद्ध लढा उभारला त्यांच्या सहचारिणी सावित्रीबाई फुले यांनाही त्यांनी या कार्यात सोबत घेतले. स्त्रि शिक्षण व अस्पुश्यता नष्ट करणे हे त्यांचे मुख्य कार्य होते. प्रथा परंपरांच्या नावाखाली नरकयातना सहन करायला लावणाऱ्या सामाजिक परंपरा जसे जठर विवाह, केशवपन, स्त्रियांच्या विशेषतः विधवांच्या पुनर्विवाहाला असलेली बंदी याविरूद्ध महात्मा फुले यांनी खूप मोठा संघर्ष केला. समाजातून अस्पृश्यता नष्ट झाली पाहीजे. स्त्रियांना सर्वच प्रकारचे अधिकार मिळालेच पाहीजेत हाच त्यांच्या चळवळीचा केंद्रबिंदू होता. वैयक्तिक शुद्ध स्वरूपाचे आचरण खऱ्या अर्थाने महिला स्वातंत्र्य व समानतेचा उद्घोष करणारा हा महात्मा भारतीय समाजजीवनावर प्रभाव टाकून गेला आहे. स्त्रियांचे अधिकार, अस्पृश्य उद्धाराचे त्यांचे कार्य हे भारतीय समाजसुधारकांसाठी नेहमीच प्रेरक राहीले राहीले आहे. त्यांनी दलित महिला व पिडीत घटकांसाठी सुरू केलेल्या शाळा, विधवांसाठीचे आश्रम दलितांसाठी खुला केलेला स्वतःचा पाणवठा ही त्यांच्या महान कार्याची साक्ष आहेत.

**महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांचे मुलभूत तत्त्वज्ञान व त्यातील साम्य :**

म. फुले अग्रणी समाजसुधारक होते स्त्रि वर्गासाठी त्यांनी केलेले कार्य रचनात्मक व महत्त्वाचे आहे. (क्रांतिकारी) स्वरूपाचे आहे.

**महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वातील साम्यस्थळे :**

१. समता.
२. बंधुता.
३. न्याय.
४. शोषणमुक्त समाज.


Copyright @ 2021 Author

Juni Khyat
(UGC Care Group I Listed Journal)
ISSN: 2278-4632
Vol-11 Issue-05 No.02 May 2021

५. शिक्षण.
६. स्वातंत्र्य.
७. समाजवाद.
८. महिलांचे निर्विवादपूर्ण स्वातंत्र्य.
९. महिलांचे निर्विवाद सर्वकष अधिकार.
१०.वंचित/दलित/शोषित समाजाला प्राधान्य.
११.महिलांची अधिकाधीक भागीदारीची आवश्यकता.
१२. महिलांच्या शिक्षणाची आवश्यकता – कुटूंब, समाज व देश विकासासाठी महत्वाची भूमिका.
१३.महिलांच्या आरोग्याची काळजी.
१४.शेतकयांच्या साठीच्या सुविधा/विज, पाणी, सबसीडी, पतपुरवठा याकडे लक्ष.
१५.शेती सुधारणासाठीच्या संकल्पना – आधुनिक शेती वाढविण्याला प्राधान्य.
१६.धार्मिक कर्मकांड मुक्त समाज त्यामुळे धार्मिक शोषण थांबुन कर्जमुक्त समाज निर्मिती.
१७.विज्ञानवादी दुष्टिकोन स्विकारार्ह समाज निर्मिती – मानसिक गुलामगिरी टाळण्यासाठीचे प्रभावी माध्यम.
१८.सामाजिक रूढीव परंपरा मुक्त समाज/जुन्या रूढी झुगारल्या.
१९.व्यक्ती व समाज विकासामध्ये शिक्षणाची आवश्यता/सर्वाधिक प्राधान्य शिक्षणास दिले.
२०.वंचित, शोषित समुह व जातीबद्दल कणव / प्रेम
२१.आदर्श समाजनिर्मितीसाठी स्वत: संघर्षात सहभाग व नेतृत्त्व.
२२.सामाजिक विषयांना प्राधान्य सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य.

**महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांचे चळवळ व कार्यातील साम्यस्थळे :**

१. दोन्ही महापुरूषांनी शोषित, वंचित घटकांना तसेच महिलांना केंद्रस्थानी ठेवून चळवळी सुरू केल्या व लढे उभारले.
२. डॉ. आंबेडकरांनी पाण्याचा सत्याग्रह केला. फुल्यांनी दलितांना पिण्याच्या पाण्यासाठी स्वत:च्या घरचा हौद खुला करून दिला. पाण्यासाठी दोन्ही घटना क्रांतिच आहेत.
३. दोन्ही महापुरूषांनी शोषित अस्पृश्य समुदायासाठी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता प्रतिपादीत करून शिक्षणाची दारे खुली केली. फुल्यांनी दलितांसाठी व महिलांमुलींसाठी पहीलीशाळा सुरू केली तर डॉ. आंबेडकरांनी मिलिंद व सिद्धार्थ महाविद्यालये सुरू केली.
४. डॉ. आंबेडकरांनी जातीयवाद, अरूपृश्यता व धर्मभेदाविरूद्ध चळवळी उभ्या केल्या तर महात्मा फुले यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी, जातीभेद नष्ट करण्यासाठी पुण्यातील सनातन्याशी हयातभर संघर्ष केला.
५. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाचे हक्क मिळवून देण्यासाठी स्वत: या समाजाचे नेतृत्त्व केले. महात्मा फुले यांनीही दलित, शोषित अस्पृश्य समाजाच्या व्यथा प्रसंगी ब्रिटिशांच्या पुढे मांडल्या तसेच व्यक्तिगत पातळीवर अशा चळवळींना सहकार्य केले.
६. डॉ. आंबेडकरांनी महिलांच्या अधिकारासाठी तसेच त्यांनी शिक्षणाचे, आरोग्याचे, चळवळीचे महत्त्व पटवून देण्यासाठी तसेच त्यांचा सामाजिक व राजकिय सहभाग वाढविण्यासाठी महीला परीषदा घेतल्या तसेच त्यांच्या अधिकारांना घटनात्मक संरक्षण दिले. म. फुले यांनी महिलांना केंद्रस्थानी मानुन त्यांच्यासाठी धार्मिक बंधने झुगारून शाळा सुरू केल्या तसेच महिलांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण समजुन स्वत:च्या सहचारिणीला त्यांनी या कातात पुढे आणले व खऱ्या अर्थाने महिलांना मुख्य अर्थाने महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला.


Copyright @ 2021 Author

Juni Khyat ISSN: 2278-4632
(UGC Care Group I Listed Journal) Vol-11 Issue-05 No.02 May 2021

७. महिलांच्या अधिकारासाठी डॉ. आंबेडकरांनी अत्यंत क्रातिकारी व समाजरचनेची उलथापालथ करूशकणारे हिंदू कोडबिल आणले. महात्मा फुल्यांनी महिलांच्या अधिकारासाठी शाळा सुरू केल्या तसेच विधवा, निराधार व परितक्या महिलांसाठी आधारगृह सुरू केले.

८. महिलांना शिक्षण व अधिकार दिल्यामुळे त्यांचा, समाजाचा व देशाचा खऱ्या अर्थाने विकास होतो यावर दोन्ही महापुरूषांचा तितकाच दृढ विश्वास होता.

९. वैयक्तिक जीवनात दोन्ही महापुरूषांनी आपल्या सहचारिणींना विशेष महत्त्व दिले व स्त्रि पुरूष समानतेचा व्यवहार केला.

१०. शेतकऱ्यांचे दु:ख जाणून म. फुलेंनी ब्रिटिशांकडे गाऱ्हाणे मांडले शेतकऱ्यांच्या दु:खाची व कर्जबाजारीपणाची कारणे शोधली व त्यावर उपाय सुचविले. तसेच तत्कालिन सरकारने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी मानुन धोरणे आखावित व आधुनिकशेतीसाठी प्रवृत्त करावे'यासाठी प्रयत्न केले. डॉ. आंबेडकरांनी शेती व शेतकऱ्यांना आर्थिक विकासासाठी महत्त्व देऊन त्यासाठी भाक्रा नागंल, दामोदर प्रकल्पाच्या माध्यमातून शेतीला पाणी मिळवून दिले. तसेच National Power Grid उभारूनशेतीसाठी ही विज उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न केले.

११. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा नष्ट करण्याकरता डॉ. आंबेडकरांनी सरकारी वित्तीय संख्याद्वारे शेतकऱ्यांना वित्त पुरवठा केला जावा असे त्यांनी सुचविले तर म. फुलेंनी शेतकऱ्यांच्या कर्जबाजारी होण्याची कारणे शोधून त्यावर उपाय सुचविले.

१२. दोन्ही महापुरूष ग्रंथोपासक होते. ग्रंथाचा दोघांचाही दोघांचाही दाडंगा व्यासंग होता. धर्मग्रंथाचा तसेच धर्माचा तुलनात्मक अभ्यास दोन्ही महापुरूषांनी केला व विशेष बाब म्हणजे दोघांनाही तात्विक अधिष्ठान असणारे समाजाची धारणा करणारे अत्यंत महत्त्वाचे ग्रंथ लिहिले त्यांच्या ग्रंथामुळे अनेक सामाजिक बदल घडून आले.

१३. डॉ. आंबेडकरांनी महात्मा फुलेंना आपले गुरू मानले ते यासाठीच की त्यांच्या जडणघडणीत म. फुलेंच्या विचार व कार्याचा प्रभाव होता.

१४. डॉ. आंबेडकरांनी जात, पंथ, वर्ण व सर्वच प्रकारचे भेदविरहीत समता,बंधुता प्रेम, अहिंसा या तत्त्वांचे अधिष्ठाण असणारा वैज्ञानिकतेचा पाया असणारा व त्याचा पुरस्कार करणारा बौद्ध धम्म स्विकारला. त्यामुळे त्यांनी एक प्रकारे देव, दानव, राक्षस, स्वर्ग, नरक पूर्नजन्म, नशीब (भाग्य), जादुटोना, व्रतवैकल्ये, अनुष्ठाणे, कर्मकांड हे सारे नाकारले. म. फुले यांनी एकप्रकारे प्रचलित धर्म व त्यांचे अस्तित्त्व व महत्त्व त्याचे सद्यस्थितील स्वरूप हे नाकारलेच होते. त्यामुळे त्यांनी (सार्वजनिक) सत्यशोधक समाज स्थापन केला. प्रचलित धर्माची चिकित्सा करून सत्यशोधनाद्वारे नव्याने धर्माची त्यांनी मांडणी केली कर्मकांड व धर्माच्या नावाने खपविले जाणारे विधी त्यांनी नाकारले व एक नवा सत्यशोधनाचा मार्ग बहुजनांना दाखविला.

१५. डॉ. आंबेडकरांनी कम्युनिष्टाप्रमाणे धर्माचे अस्तित्त्व व गरजच नाकारली असे नाही त्यांनी धर्म हा मानवाच्या दैनंदिन जडणघडणीसाठी व प्रगत मानण्यासाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. महात्मा फुलेंनी प्रचलित व परंपरागत ईश्वराचे स्वरूप न मानता धर्म आवश्यक समजला मात्र सृष्टिचा जो नियता आहे त्याला निर्मिकाची उपमा दिली. अर्थातच ते परंपरेच्या तत्त्वातच बसणारे नव्हतेच.

१६. डॉ. आंबेडकरांनी बुद्धाला गुरू मानले. बुद्धाची मानवी कल्याणकारी तत्त्वे त्यांना अधिक जवळची वाटली. बुद्ध सर्वत्र पसरला तो केवळ बौद्ध धम्माच्या आदर्शवत असणाऱ्या आचरणीय कर्मकांड विरहीत शिकवणूकीमुळे म. फुलेंनीही त्यांच्या साहीत्यात/लेखनात/ग्रंथात बऱ्याच ठिकाणी बुद्धांच्या तत्त्वांचा त्यांच्या शिकवणूकीचा उल्लेख केला आहे. म. फुले देखील बुद्धाकडे तात्विक दृष्टिने आकर्षित झाले होते.

**निष्कर्ष :**

 Copyright @ 2021 Author

ISSN: 2278-4632
Vol-11 Issue-05 No.02 May 2021

म. फुले व डॉ. आंबेडकर या दोन व्यक्ती म्हणून वेगळ्या आहेत. मात्र त्यांच्या जीवन विचार व कार्यामध्ये खूप मोठे साम्य आढळून येते. किंबहुना साम्य आहेच. महात्मा फुलेंच्या विचारांचा कार्याचा प्रचंड मोठा प्रभाव डॉ. आंबेडकर यांचे वडील रामजी यांच्यावरही होता व डॉ. आंबेडकरांनी तर महात्मा फुले यांना गुरू मानले. महात्मा फुले यांचे समता, बंधुता, न्याय तसेच समताधिष्ठित,शोषणमुक्त, स्त्रियांना महत्त्व देणारे सर्व तत्त्वज्ञ खऱ्या अर्थानी डॉ. आंबेडकरांनी आपल्या सर्वच चळवळींसाठी शिरोधार्थ मानले. व म. फुले यांचा वैचारिक वारसा पुढे चालविला त्यामुळे म. फुले व डॉ. आंबेडकर यांच्यात वैचारिक फरक शोधूनही सापडणार नाही. महात्मा फुलें यांची अस्पृश्यांप्रती, महिलांप्रती असलेली कणव व ममता डॉ. आंबेडकर यांच्यामध्येही होती. संविधान साकारतांना त्यांनी महात्मा फुलेंची सारी समोर ठेवूनच त्याचा समावेश संविधानात केलेला दिसून येतो. म्हणून संविधान म्हणजेच महात्मा फुले यांच्या विचार व कार्याची प्रलिपी पाहिजे. म. फुले यांचे विचार, कार्य, त्यांनी सुरू केलेल्या चळवळी तसेच डॉ. आंबडकर यांच्या चळवळी व कार्य यामध्यै खूप मोठे वैचारिक व कार्यप्रवण साम्यता आढळून येते.

**संदर्भ :**

१.उगले जी. ए.; 'महात्मा ज्योतीराव फुले एक मुक्त चिंतन' कौशल्य प्रकाशन औरंगाबाद २०००.
२.ओक चिंतामण गणेश, ज्योतिबा फुले कार्य व वाङ्.मय यांचे सत्यस्वरूप दर्शन, काळ प्रकाशन, पुणे १९४८.
३.कटारे मोतीराम 'फुले आंबेडकरी साहित्य : आकलन आणि आस्वाद', कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद २००६.
४.कल्याणकर बा. ह. 'महात्मा फुले विचार आणि संदर्भ', राजमुद्रा प्रकाशन, औरंगाबाद १९८५.
५.काचोळे दा. धो. 'फुले – आंबेडकर', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद २००४.
६.कीर धनंजय, 'महात्मा ज्योतीराव फुले – आमच्या समाज क्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६८.
७.कीर धनंजय, मालशे स. ग., फडके य. दी., महात्मा फुले समग्र वाङ्.मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००६ (सहावी आवृत्ती)
८.फडके भालचंद्र, 'फुले – आंबेडकर : शोध आणि बोध', आनंद प्रकाशन, औरंगाबाद १९८५.
९.ठोकरे तानाजी, 'महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य', लोकवाङ्.मय गृह, मुंबई १९९१.
१०.आंबेडकर बाबासाहेब, जातिभेद निर्मूलन, सुगत प्रकाशन, नागपूर २००९.


Copyright @ 2021 Author